**प्रेस नोटस दिनांक १७/०६/२०१९**
**कोथरूड पोलीस ठाणे पुणे शहर**
**पाहीजे आरोपीस मुंबई येथून ताब्यात घेवून अटक केलेबाबत**

कोथरूड पोलीस ठाणे गु.र.नं. १२३/२०१९ भा.द.वि.कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे दाखल गुन्हयात पाहीजे असलेला आरोपी नामे अनिल वाशदेव पंजाबी रा. खार मुंबई याचा शोध घेवून नमूद आरोपी मिळून येत नव्हता. सदर आरोपीचा तांत्रीक विष्लेषणाचे अधारे तपास करीत असताना आरोपी हा खार मुंबई भागात असल्याचे निष्पन्न झाल्याने पोउनि जर्दे, पोहवा जगताप व पोना वाव्हळ यांनी सदर घटनेची माहीती वरिष्ठांना देवून त्याप्रमाणे वरिष्ठांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली आज पहाटे मुंबई येथे जावून नमूद आरोपीचा बातमीदाराकडून मिळालेली माहीती व तांत्रीक विष्लेषणाव्दारे खार भागात घेतला असता नमूद आरोपी हा ए-१२, शांतीनगर बिल्डींग ५ वा रोड खार वेस्ट मुंबई येथे मिळून आल्याने त्यास स्थानिक पोलीसांचे मदतीने ताब्यात घेवून कोथरूड पोलीस ठाणे येथे घेवून येवून त्यास दाखल गुन्हयात आज दि १७/०६/२०१९ रोजी अटक केली आहे. नमूद आरोपी पोलीस कोठडी घेवून अधिक तपास करीत आहोत.

अशा प्रकारे पोउनि जर्दे,पोहवा जगताप व पोना वाव्हळ यांनी मा पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ पुणे शहर, सहा पोलीस आयुक्त कोथरूड विभाग पुणे, प्रतिभा जोशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक व एस एस खटके, पोलीस निरीक्षक गुन्हे , कोथरूड पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली आरोपीस मुंबई येथे जावून त्याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेवून पुणे येथे आणून दाखल गुन्हयात अटक करून उत्तम कामगिरी केली आहे.

(प्रतिभा जोशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुणे